ePaper
होर्मुझ सामुद्रधुनीजवळ व्यावसायिक जहाजावर हल्ला? 24 भारतीय खलाशी अडकले
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

उन्हाळी सुट्ट्यांत खासगी ट्रॅव्हल्सची मनमानी

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 09 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाच प्रमुख मुद्द्यांवर सर्वपक्षीय एकमत, आक्रमक ‘प्लॅन ऑफ अ‍ॅक्शन’ निश्चित

# मोदी सरकारविरोधात INDIA आघाडीची रणनीती

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्रातील मोदी सरकारविरोधात पुढील राजकीय लढ्याची दिशा ठरवण्यासाठी इंडिया आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक नवी दिल्ली येथे पार पडली. या बैठकीत आघाडीतील २५ पक्षांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आगामी काळातील राजकीय भूमिका, जनतेच्या प्रश्नांवर संयुक्त आंदोलन आणि संसदेत समन्वय साधण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत खरगे यांनी पाच प्रमुख मुद्द्यांवर सर्व पक्षांमध्ये एकमत झाल्याची माहिती दिली.**




### कुठल्या पाच मुद्द्यांवर इंडिया आघाडीचं एकमत?

आम्ही भारताच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहिणार आहोत. व्होट चोरी आणि निवडणुकींमधली पारदर्शकता हा त्याचा विषय आहे. SIR, मतदार याद्यांचे घोळ, तसंच निवडणूक प्रक्रियेतला गोंधळ हे मुद्देही त्यात असणार आहेत.

२) लाखो विद्यार्थ्यांचं भवितव्य ठरवणाऱ्या ‘नीट’ परीक्षांचे पेपर फुटतात. जे काही घडलं आहे ती परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे शिक्षण मंत्र्यांनी तातडीने राजीनामा दिला पाहिजे. कारण त्यांच्या कार्यकाळात नीट आणि सीबीएसई परीक्षांमध्ये लाखो युवकांसह विश्वासघात झाला आहे, तरुण रस्त्यावर आले आहेत.

३) वर्तमानातली देशाची आर्थिक स्थिती ही अतिशय गंभीर आहे. बेरोजगारी वाढते आहे, महागाई वाढते आहे आणि शेतकऱ्यांचे मुद्दे यावर आम्ही आवाज उठवणार आहोत. तसंच जनहिताचे अन्य विषयही आम्ही चर्चिले आहेत. आम्हाला वाटतं आहे की सरकारने आता या प्रश्नांवर सर्वपक्षीय बैठक बोलवली पाहिजे.

४) इंडिया आघाडीचे सगळे पक्ष दर दोन महिन्यांनी बैठक करतील. यापुढची बैठक ऑगस्ट महिन्यात हैदराबाद या ठिकाणी आयोजित केली जाईल.

५) पावसाळी अधिवेशनाच्या दरम्यान समन्वय बैठका आयोजित केल्या जातील. या सगळ्या विषयांवर आमची सहमती झाली आहे.

राहुल गांधी, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, अखिलेश यादव, सुप्रिया सुळे, मेहबुबा मुफ्ती यांच्यासह अनेक प्रमुख नेते या बैठकीला उपस्थित होते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन हे ऑनलाइन माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते.

खरगे यांनी सांगितले की, देशातील निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून मतदार याद्यांतील कथित त्रुटी, मतदार नोंदणीतील अनियमितता आणि मतदान प्रक्रियेसंदर्भातील शंकांबाबत भारताच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहिण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम राहावा यासाठी या विषयावर सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे आघाडीचे मत आहे.

बैठकीत नीट आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांचाही मुद्दा जोरदारपणे मांडण्यात आला. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या परीक्षांमध्ये झालेल्या त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे नमूद करण्यात आले. या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी इंडिया आघाडीने केली आहे. देशातील आर्थिक परिस्थितीबाबतही बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. वाढती बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या आणि सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण या विषयांवर सरकारला जाब विचारण्याचा निर्णय घेण्यात आला. रोजगार निर्मिती, कृषी क्षेत्रातील अडचणी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती यांसारख्या प्रश्नांवर जनआंदोलन उभारण्याची तयारी आघाडीने दर्शविली आहे. या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणीही करण्यात आली. इंडिया आघाडीची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी पुढे दर दोन महिन्यांनी नियमित बैठक घेण्याचे ठरविण्यात आले आहे. यानुसार पुढील बैठक ऑगस्ट महिन्यात हैदराबाद येथे होणार आहे. तसेच आगामी पावसाळी अधिवेशनादरम्यान संसदेत संयुक्त भूमिका मांडण्यासाठी समन्वय बैठका आयोजित केल्या जाणार आहेत.

बैठकीनंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी इंडिया आघाडीमध्ये कोणतीही फूट नसून सर्व घटक पक्ष एकत्रितपणे काम करत असल्याचा दावा केला. विरोधकांची एकजूट कायम असल्याचे सांगत त्यांनी आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक आक्रमक भूमिका घेण्याचे संकेत दिले.

### खरगे काय म्हणाले?

इंडिया आघाडीची बैठक पार पडली, यामध्ये २५ पक्ष सहभागी झाले होते. त्यांनी सगळ्यांनी त्यांची मतं मांडली. आम्ही पाच मुद्दे काढले आहेत. त्यावर आमची सहमती झाली आहे. या पाच मुद्द्यांवर आम्ही काम करणार आहोत, लढणार आहोत आणि पुढे जाणार आहोत. असं म्हणत कुठल्या पाच मुद्द्यांवर चर्चा झाली त्याची माहिती मल्लिकार्जुन खरगेंनी दिली.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला गती

## छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी 1216 हेक्टरपैकी 735 हेक्टर जमीन मिळाली

**महाईन्यूज । पुणे**

**पुरंदर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेने आता निर्णायक वेग घेतला आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या एकूण १,२१६ हेक्टर क्षेत्रापैकी ७३५.२५ हेक्टर क्षेत्रासाठी शेतकऱ्यांची संमती मिळाली असून, हे प्रमाण ६०.४६ टक्क्यांवर पोहोचले आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा मार्ग अधिक सुकर होत असल्याचे चित्र दिसत आहे.**



### सुधारित मोबदला पॅकेजनंतर शेतकऱ्यांचा प्रतिसाद

राज्य शासनाने जाहीर केलेल्या सुधारित मोबदला पॅकेजनंतर शेतकऱ्यांचा प्रतिसाद लक्षणीय वाढल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. सध्या संमतिपत्रे, सातबारा उतारे आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी सुरू असून, त्यानंतर अंतिम भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रशासनाकडून संबंधित गावांमध्ये सातत्याने बैठका घेऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनही केले जात आहे. यामुळे भूसंपादन प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला आणि पारदर्शक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने विशेष यंत्रणा कार्यान्वित केली.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, विमानतळासाठी प्रस्तावित सात गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात जमीन देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. वनपुरी गावातील २६५ शेतकऱ्यांनी ११८.४५ हेक्टर क्षेत्रासाठी संमती दिली आहे. उदाची वाडीतील ५९ शेतकऱ्यांनी ४२ हेक्टर, तर कुंभारवळण गावातील २५० शेतकऱ्यांनी ११२ हेक्टर क्षेत्र देण्यास होकार दर्शविला आहे.

पारगावमध्ये सर्वाधिक ५८० शेतकऱ्यांनी १००.४२ हेक्टर क्षेत्रासाठी संमती दिली आहे. एकतपूर येथे २९८ शेतकऱ्यांनी १४६.५० हेक्टर, खानवडीतील २६० शेतकऱ्यांनी १५०.८८ हेक्टर आणि मुंजवडीतील १७५ शेतकऱ्यांनी ६५ हेक्टर क्षेत्र देण्यास तयारी दर्शविली आहे. या आकडेवारीमुळे भूसंपादन प्रक्रियेत अपेक्षित प्रगती होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे जिल्ह्यासाठी हा प्रकल्प विकासाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विमानतळ उभारणीमुळे औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, वाहतूक सुविधा आणि व्यावसायिक संधींमध्ये मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भूसंपादनाचा टप्पा वेगाने पूर्ण झाल्यास विमानतळाच्या प्रत्यक्ष उभारणीच्या कामालाही लवकर सुरुवात होऊ शकते. त्यामुळे राज्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या या प्रकल्पाकडे आता शेतकरी, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचे लक्ष लागले आहे. भूसंपादनासाठी मिळालेला शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद प्रशासनासाठी दिलासादायक मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या विमानतळ प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रशासनाकडून शेतकऱ्यांशी सातत्याने संवाद साधला जात असून उर्वरित भूसंपादन प्रक्रियाही लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रस्तावित विमानतळामुळे पुणे जिल्ह्याची देश-विदेशातील संपर्कक्षमता वाढून परिसराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# केडगाव गर्भलिंग निदान-गर्भपात प्रकरण; खासगी डॉक्टरभोवती संशयाचे वलय

**महाईन्यूज । पुणे**

**दौंड तालुक्यात उघडकीस आलेल्या गर्भलिंग निदान चाचणी आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले असताना, केडगाव परिसरातील एका खासगी डॉक्टरबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून अण्णासाहेब गिरी यांना अटक करण्यात आली आहे.**



### रुग्णालयात वारंवार संशयास्पद हालचाली

परिसरातील काही नागरिकांनी या रुग्णालयात संशयास्पद हालचाली वारंवार दिसत असल्याचा दावा केला आहे. तपास यंत्रणांनी रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज, रजिस्टर आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. संबंधित डॉक्टर आणि अण्णासाहेब गिरी यांच्यातील आर्थिक व्यवहारांचीही तपास व्हावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. या प्रकरणात आणखी काही मध्यस्थ किंवा एजंट कार्यरत होते का, याचाही शोध घेणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अण्णासाहेब गिरी याची या डॉक्टरकडे वारंवार ये-जा असल्याची चर्चा अनेक वर्षांपासून परिसरात सुरू होती. संबंधित डॉक्टरच्या रुग्णालयाबाहेर अनेकदा चारचाकी वाहनांच्या रांगा लागत असल्याचे दृश्य नागरिकांनी पाहिल्याचा दावा केला आहे. त्यामुळे या रुग्णालयात नेमके कोणत्या प्रकारचे उपचार अथवा वैद्यकीय सेवा दिल्या जात होत्या, याबाबत आता विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत.

गर्भलिंग निदान आणि गर्भपात प्रकरणातील तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे या डॉक्टरची चौकशी झाली आहे का?, संबंधित वैद्यकीय नोंदींची पडताळणी करण्यात आली आहे का?, तसेच या रुग्णालयातील व्यवहारांची तपास यंत्रणांनी सखोल छाननी केली आहे का?, असे प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

या संपूर्ण प्रकरणामुळे आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन आणि पोलिस यंत्रणेच्या भूमिकेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपाताच्या साखळीमध्ये आणखी कोणाचा सहभाग होता का, याचा उलगडा होणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी संबंधित सर्व बाबींची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. तपास यंत्रणांच्या पुढील कारवाईकडे संपूर्ण केडगाव परिसराचे लक्ष लागले आहे.

परिसरात अशीही चर्चा आहे की संबंधित डॉक्टरकडे मोठ्या प्रमाणावर गर्भपाताच्या शस्त्रक्रिया होत असत. काही नागरिकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची मागणी केली आहे. गर्भपातासंदर्भातील वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रणांचीही तपासणी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

# उन्हाळी सुट्ट्यांत खासगी ट्रॅव्हल्सची मनमानी

## शनिवार-रविवारी दरवाढीचा फटका; आरटीओच्या कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**उन्हाळी सूट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची शहरातील ट्रॅव्हल्स चालकांकडून दुपटीने भाडे आकारून आर्थिक लूट होत आहे. पुणे ते नागपूर प्रवासाचे इतर वेळेसचे तिकिट दीड हजार ते सोळाशे रूपये या दरम्यान आहे; मात्र सध्या खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांकडून दोन ते अडीच हजार रुपये दर आकारला जात आहे; तसेच शनिवारी आणि रविवारी दरात आणखी वाढ केली जात असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.**



पुणे ते नागपूर या मार्गावरील प्रवासासाठी नेहमी दीड हजार ते सोळाशे रुपये दरम्यान तिकीट मिळत असताना सध्या दोन हजार ते अडीच हजार रुपये भाडे आकारले जात आहे. काही ट्रॅव्हल्सकडून शनिवार व रविवारी मागणी वाढल्याचे कारण देत दरात आणखी वाढ केली जात असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात रोजगार, उद्योग आणि शिक्षणासाठी राज्याच्या विविध भागांतून नागरिक आले आहेत. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये हे नागरिक कुटुंबासह गावी जात असल्याने प्रवाशांची संख्या वाढली आहे. परिणामी रेल्वेचे आरक्षण पूर्ण भरले असून एसटीची तिकिटेही सहज उपलब्ध होत नाहीत. याच परिस्थितीचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्सकडून अवास्तव भाडे आकारले जात असल्याची तक्रार आहे.

प्रवाशांच्या मते, शहरातील प्रादेशिक परिवहन विभागाने अशा ट्रॅव्हल्सवर नियंत्रण ठेवणे अपेक्षित असताना पुरेशी कारवाई होत नसल्यामुळे चालकांची मनमानी वाढली आहे. त्यामुळे सुट्ट्यांच्या काळात सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे.

याबाबत आरटीओ अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रवाशांकडून जादा भाडे आकारल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई केली जाते. नागरिकांनी अशा प्रकारांची तक्रार करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### सुट्टीत प्रवाशांचा वाढता खर्च

उन्हाळी सुट्ट्यांमुळे शनिवार आणि रविवारी प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. या वाढलेल्या मागणीचा आधार घेत अनेक खासगी ट्रॅव्हल्सकडून भाड्यात मोठी वाढ केली जात आहे. रेल्वे आणि एसटीची पर्यायी व्यवस्था मर्यादित असल्याने प्रवाशांना जादा भाडे देऊनही खासगी प्रवासाचा पर्याय स्वीकारावा लागत आहे.

# पोलिस दलात शिस्तीचा बडगा; हद्दीबाहेर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर लगाम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात शिस्त आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच वास्तव्यास राहण्याचे आदेश दिले आहेत.**




टपऱ्या, खाद्यपदार्थ, चायनीज विक्रेते, नागरिक व कुत्रीप्रेमींकडून तसेच, उघड्यावर व कचराकुंडीत सहजपणे खाद्य मिळत असल्याने मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या वाढतच आहे. रात्रीच्या वेळी वाहने व पादचाऱ्यांवर कुत्री धावून जातात. अचानक अंगावर कुत्री आल्याने त्यांच्या तावडीतून सुटण्यासाठी वाहन पळविताता किंवा पळताना अपघात होतात.

रात्रीच्या अंधारात रस्त्यांवर नागरिकांना अक्षरश: जीव मुठीत घेऊन जावे लागते. कुत्र्यांच्या चाव्यामुळे तसेच, अपघात होऊन जखमी होण्याच्या घटना वाढल्या आहेत. विशेषत: लहान मुलांवर हल्ला करून त्यांचा चावे घेण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. वर्षाला २९ हजार जणांना कुत्री चावत असल्याचे महापालिकेच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून मोकाट कुत्री पकडून त्याच्यावर नसबंदी (निर्बिजीकरण) शस्त्रक्रिया केली जाते. एका शस्त्रक्रियेसाठी महापालिका सुमारे १ हजार रूपये खर्च करते. महापालिकेकडून दिवसाला अवघ्या ८ ते १० कुत्र्यांवर ही शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे एक लाख भटकी कुत्री असलेल्या एवढ्या मोठ्या शहरातील कुत्र्यांची संख्या नियंत्रणात कशी येणार हा मोठा प्रश्न आहे.

त्यामुळे शहरवासीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिका प्रशासन अयपशी ठरल्याचे स्पष्ट होत आहे. तर, भटक्या आणि मोकाट कुत्र्यांना अन्न व खाद्य देणाऱ्या नागरिकांनी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात नोंदणी करावी, असे आवाहन महापालिकेने केले होते. त्याला प्राणिप्रेमींनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे शहरात किती नागरिक, संस्था भटक्या कुत्र्यांना अन्न देतात, याची नोंद महापालिकेकडे नाही.

> “ नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्थानिक उपस्थिती अत्यंत महत्त्वाची आहे. कोणतीही घटना घडल्यानंतर तत्काळ प्रतिसाद मिळावा आणि जबाबदारी निश्चित व्हावी, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहणे आवश्यक आहे.
>
> - विनय कुमार चौबे, पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

### दारूकांडानंतर जबाबदारी निश्चित

फुगेवाडी विषारी दारूकांडामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांची मोठी बदनामी झाली. या प्रकरणात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला, तर स्थानिक पातळीवर अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे आरोपही झाले. त्यानंतर काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर आयुक्तालय आता शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना दिसत असून, प्रत्येक अधिकाऱ्याची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

### ...म्हणून अधिकाऱ्यांचे हद्दीबाहेर वास्तव्य

मुलांचे शिक्षण, स्वतःचे घर, जोडीदाराची नोकरी, ज्येष्ठ पालकांची जबाबदारी आणि पुणे परिसरातील दीर्घकालीन वास्तव्य यामुळे काही अधिकारी कार्यक्षेत्राबाहेर राहत होते. याशिवाय चांगल्या निवासी सुविधा, शैक्षणिक संस्था, आरोग्यसेवा आणि नागरी सोयीसुविधांचा विचार करूनही अनेकांनी हद्दीबाहेरील परिसरातील निवास कायम ठेवला. पिंपरी- चिंचवड आयुक्तालयात बदली झाल्यानंतरही काही अधिकारी जुन्या निवासस्थानावरूनच ये-जा करीत असल्याचे पहावयास मिळाले.

# भारत-रशिया संबंध : विश्वास, सहकार्य आणि भविष्याची दिशा



## भूमिका

**जागतिक राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, असे म्हटले जाते. मात्र काही संबंध हे परस्पर विश्वास, सहकार्य आणि दीर्घकालीन हितसंबंधांवर उभे असतात. भारत आणि रशिया यांच्यातील संबंध हे त्याचेच उत्तम उदाहरण आहे. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांनी नुकत्याच केलेल्या वक्तव्यातून पुन्हा एकदा या मैत्रीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.**



भारत आणि रशियाचे संबंध केवळ राजनैतिक नाहीत, तर ऐतिहासिक आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या औद्योगिक उभारणीत, संरक्षण क्षमतेच्या बळकटीकरणात आणि तांत्रिक प्रगतीत रशियाचे योगदान मोठे राहिले आहे.

अनेक आंतरराष्ट्रीय प्रसंगी रशियाने भारताची बाजू समजून घेतली, तर भारतानेही कठीण काळात मैत्रीचे नाते जपले. त्यामुळे दोन्ही देशांतील संबंध हे व्यवहारापुरते मर्यादित नसून विश्वासाच्या भक्कम पायावर उभे आहेत. आज जगातील सामरिक समीकरणे झपाट्याने बदलत आहेत.

भारताचे अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांशी संबंध वाढत आहेत. व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण आणि गुंतवणूक या क्षेत्रांत सहकार्य विस्तारत आहे.

हे भारताच्या राष्ट्रीय हिताचेच आहे. मात्र त्याचवेळी भारताने रशियाशी असलेली मैत्री अबाधित ठेवली आहे. ही संतुलित भूमिका भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची साक्ष देते.

युक्रेन संघर्षानंतर रशियाला जागतिक स्तरावर एकाकी पाडण्याचे प्रयत्न झाले. अनेक देशांनी निर्बंध लादले. अशा परिस्थितीत भारताने कोणाच्याही दबावाला बळी न पडता स्वतःच्या हिताचा विचार केला.

ऊर्जा सुरक्षेसाठी रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवली. यामुळे भारताला आर्थिक लाभ झाला, तर रशियालाही विश्वासार्ह भागीदाराचा आधार मिळाला. हेच वास्तव दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करणारे ठरले.

रशिया आणि चीन यांची वाढती जवळीक तसेच पाकिस्तानची चीनवर वाढती निर्भरता यामुळे काही विश्लेषक भारत-रशिया संबंधांबाबत शंका व्यक्त करतात.

तथापि, गेल्या सात दशकांचा इतिहास पाहता अशा शंका फारशा टिकत नाहीत. बदलत्या जागतिक परिस्थितीतही भारत आणि रशिया यांनी परस्पर हितसंबंधांना प्राधान्य दिले आहे. दोन्ही देशांना एकमेकांच्या सामरिक महत्त्वाची पूर्ण जाणीव आहे. आगामी काळात संरक्षण, ऊर्जा, अवकाश संशोधन, अणुऊर्जा, तंत्रज्ञान आणि व्यापार या क्षेत्रांत सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध आहेत.

द्विपक्षीय व्यापार मोठ्या प्रमाणात वाढविण्याचे उद्दिष्टही दोन्ही देशांनी ठेवले आहे. त्यामुळे या मैत्रीचे महत्त्व भविष्यात आणखी वाढणार आहे. अस्थिर आणि स्वार्थप्रधान होत चाललेल्या जागतिक व्यवस्थेत विश्वासार्ह मित्रांची संख्या कमी होत आहे. अशा वेळी भारत आणि रशिया यांच्यातील मैत्री हा स्थैर्याचा आधार मानला जातो.

मतभेद असू शकतात, प्राधान्यक्रम बदलू शकतात; पण परस्पर विश्वास आणि आदर कायम राहिला तर ही भागीदारी अधिक मजबूत होईल. म्हणूनच भारत-रशिया मैत्रीचा हा प्रवास भविष्यातही असाच दृढ राहावा, ही अपेक्षा केवळ दोन्ही देशांचीच नव्हे तर जागतिक स्थैर्याचीही गरज आहे.

## प्रासंगिक »

### राजा आणि संत

**एका वनात दोन संत एकांतात तपश्चर्या करत राहत होते. क्वचित यात्रेकरू त्यांना भेटत असत. एकदा यात्रेकरूंकडून त्या संतांची कीर्ती ऐकून राजा त्यांना भेटण्यासाठी निघाला.**

ही बातमी संतांना समजताच ते चिंतेत पडले. राजाची ये-जा वाढली तर त्याच्यासोबत अनेक लोक येतील आणि वनातील शांतता भंग होईल, असे त्यांना वाटले.

राजा येण्याच्या वेळी दोन्ही संतांनी एक युक्ती केली. त्यांनी हातात काठ्या घेतल्या आणि एकमेकांशी जोरदार वाद घालण्याचे नाटक सुरू केले.

एक संत स्वतःच्या ज्ञानाची स्तुती करू लागला, तर दुसरा त्याला खोटारडा म्हणू लागला. राजा आणि त्याच्या सोबत्यांनी हे दृश्य पाहिले. हे संतही सामान्य माणसांसारखे भांडतात, असा त्यांचा समज झाला.

त्यामुळे त्यांनी तेथून निघून जाणेच योग्य समजले. राजा गेल्यानंतर दोन्ही संत हसले, एकमेकांना गळाभेट दिली आणि पुन्हा आपल्या साधनेत मग्न झाले.

- तात्पर्य : **मोठे आणि चांगले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कधीकधी युक्तीचा अवलंब करावा लागतो.**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नुकत्याच झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

# 'अराजकीय' मंचांची वाढती ताकद

स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींमुळे तरुणांमध्ये निर्माण झालेला असंतोष आता नव्या स्वरूपात व्यक्त होताना दिसत आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या उघड पाठिंब्याशिवाय उभे राहिलेले हे आंदोलन मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरले.

गेल्या काही वर्षांत देशभरात विविध स्पर्धा परीक्षांचे पेपरफुटीचे प्रकार वारंवार घडले आहेत. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे परिश्रम घेत असताना काही व्यक्तींच्या गैरप्रकारांमुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरते. अनेकदा परीक्षा रद्द होतात, भरती प्रक्रिया लांबणीवर पडते आणि विद्यार्थ्यांचे मानसिक तसेच आर्थिक नुकसान होते. त्यामुळे या प्रश्नावर तरुणांमध्ये नाराजी असणे स्वाभाविक आहे.

या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामागे उभा राहिलेला नवा मंच. आजच्या काळात समाजमाध्यमांवर लोकप्रियता मिळवणे तुलनेने सोपे असले, तरी त्या



लोकप्रियतेचे प्रत्यक्ष जनआंदोलनात रूपांतर करणे कठीण असते.

जंतर-मंतरवरील उपस्थितीने एवढे मात्र स्पष्ट केले की, तरुणांना आपले प्रश्न मांडण्यासाठी नव्या व्यासपीठांची गरज आहे. पारंपरिक विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्ष यांच्याबद्दलचा वाढता अविश्वासही यामागे दिसून येतो. विद्यार्थी राजकारणासाठी उपलब्ध असलेल्या जागा सातत्याने कमी होत आहेत.

अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थी निवडणुका होत नाहीत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आवश्यक असलेली लोकशाही व्यवस्था कमकुवत होत आहे. परिणामी, तरुणांचा आवाज व्यक्त होण्यासाठी पर्यायी मंच पुढे येत आहेत. हे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे संकेत मानावे लागतील.

मात्र कोणताही मंच केवळ असंतोष व्यक्त करून दीर्घकाळ टिकत नाही. त्यासाठी स्पष्ट भूमिका, व्यापक दृष्टीकोन आणि सातत्यपूर्ण कार्य आवश्यक असते. एखाद्या विशिष्ट मुद्द्यावर निर्माण झालेली लोकप्रियता कायम ठेवण्यासाठी संघटनात्मक बांधणी आणि ठोस कार्यक्रमांची गरज असते. अन्यथा अनेक तात्पुरते प्रवाह काळाच्या ओघात विस्मरणात जातात.

जंतर-मंतरवरील आंदोलनाने सरकारसमोर उत्तरदायित्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याचवेळी तरुणांच्या मनात साचलेल्या असंतोषालाही वाचा फोडली आहे. या आवाजाकडे केवळ आंदोलन म्हणून न पाहता, शिक्षण आणि रोजगार व्यवस्थेतील उणिवांबाबतचा इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. कारण देशाच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही व्यवस्थेला परवडणारे नाही.

## ।। अभंगवाणी ।।



मजसवें आतां येऊं नका कोणी ।
सासुरवासिनी बाइयानो ॥१॥

न साहवे तुम्हां या जनाची कूट ।
बोलती वाईट ओखटें तें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वरसोली बंदऱ्याला टेट्रापॉडचे अभेद्य कडे

## महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने ८० कोटी रुपयांचा ग्रोयेन्स बंधारा प्रकल्प हाती घेतला

**महाईन्यूज । अलिबाग**

**रायगड जिल्ह्यातील महत्त्वाच्या मच्छीमार बंदरांपैकी एक असलेल्या वरसोली बंदरातील गाळ साचण्याच्या गंभीर समस्येवर आता कायमस्वरूपी उपाययोजना सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून तब्बल ८० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात येणाऱ्या ग्रोयेन्स बंधारा प्रकल्पामुळे बंदरातील नौकांची अडचण दूर होणार असून, समुद्राच्या लाटांपासून संरक्षणासाठी अवाढव्य टेट्रापॉड्सचा वापर केला जाणार आहे.**



वरसोली बंदरात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर गाळ साचत असल्याने विशेषतः ओहोटीच्या काळात मासेमारी नौका अडकण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या. त्यामुळे मच्छीमारांना मासेमारीसाठी समुद्रात जाणे आणि परत बंदरात येणे मोठे धोकादायक ठरत होते. अनेकदा नौका चिखलात अडकून आर्थिक नुकसानही सहन करावे लागत होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक मच्छीमारांकडून कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी केली जात होती. अखेर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने या समस्येची दखल घेत ग्रोयेन्स बंधारा उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.

या प्रकल्पांतर्गत वरसोली आणि चाळमळा दरम्यानच्या खाडी परिसरात समुद्राच्या दिशेने समांतर जाणारे प्रत्येकी सुमारे ५०० मीटर लांबीचे दोन मजबूत बंधारे उभारले जात आहेत. या बंधाऱ्यांमुळे समुद्रातील प्रवाह नियंत्रित राहणार असून, बंदर परिसरात गाळ साचण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा दावा केला जात आहे. त्याचबरोबर दोन बंधाऱ्यांच्या मधील साचलेला गाळ उपसून तो भाग अधिक खोल करण्यात येणार असल्याने ओहोटीच्या वेळीही नौकांना सहजपणे बंदरात प्रवेश करता येणार आहे.

समुद्रातील प्रचंड लाटांचा बंधाऱ्यावर होणारा तडाखा कमी करण्यासाठी या प्रकल्पात दोन, चार आणि सहा टन वजनाचे विशाल टेट्रापॉड्स वापरण्यात येत आहेत. हे टेट्रापॉड्स बंधाऱ्याच्या बाहेरील भागावर बसवले जात असून त्यामुळे समुद्राच्या लाटा थेट बंधाऱ्यावर आदळणार नाहीत. परिणामी बंधाऱ्याची धूप, पडझड होण्याचा धोका कमी होतो.

सध्या चाळमळा बाजूच्या बंधाऱ्यावर टेट्रापॉड बसवण्याचे काम वेगाने सुरू असून, एकूण सुमारे दोन हजार टेट्रापॉड्स बसविण्यात येणार असल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाकडून देण्यात आली आहे. चालमळा बाजूच्या बंधाऱ्याचे जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले असून वरसोली बाजूच्याही बंधाऱ्याचे काम गतीने सुरू आहे.

### मच्छीमारांना थेट लाभ

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वरसोली परिसरातील सुमारे १५० मच्छीमारांना थेट फायदा होणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील विविध भागांमधून येणाऱ्या मच्छीमारांसाठीही वरसोली बंदर सुरक्षित आश्रयस्थान ठरणार आहे. बंदरात नौका सुरक्षितरीत्या नांगरून ठेवता येणार असल्याने मासेमारी व्यवसायाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मच्छीमारांच्या मते, पावसाळ्यात तसेच ओहोटीच्या वेळी निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे अनेकदा मासेमारीवर परिणाम होत होता. आता नवीन बंधाऱ्यामुळे नौकांची सुरक्षितता वाढेल तसेच बंदरात वर्षभर सुरळीत वाहतूक शक्य होईल.

> “मच्छीमारांना ओहोटीदरम्यानही नौका बंदरात आणता याव्यात यासाठी दोन समांतर बंधाऱ्यांची रचना करण्यात आली आहे. या दोन बंधाऱ्यांमधील गाळ काढल्यानंतर नौकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध होईल. सध्या चाळमळा आणि वरसोली या दोन्ही बाजूंनी काम वेगाने सुरू आहे.
>
> - प्रवीण पाटील, उपअभियंता मेरीटाइम बोर्ड.

# उड्डाणपूलाच्या उद्घाटनानंतर एका तासातच पडले खड्डे; मुंबईकर संतप्त

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईत नुकत्याच सुरू झालेल्या २४८ कोटी रुपयांच्या मृणालताई गोरे उड्डाणपुलावरून नवा वाद निर्माण झाला आहे. उद्घाटन झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच पुलावरील रस्त्याच्या पृष्ठभागाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अनेक नागरिकांनी रस्त्यावर खड्डे आणि उखडलेल्या डांबरासारखे दिसणारे भाग दाखवत कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.**



गोरेगाव परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात आलेल्या या उड्डाणपुलाचे मुख्यमंत्री आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. मात्र पुल सुरू होताच त्यावरील काही भागांमध्ये डांबराचे पॅचवर्क आणि खड्ड्यासारखी दिसणारी ठिकाणे नागरिकांच्या नजरेत भरली. त्यामुळे सोशल मीडियावर महापालिकेवर टीकेची झोड उठली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे राष्ट्रीय प्रवक्ते अनिश गवांडे यांनीही या मुद्द्यावरून मुंबई महानगरपालिकेवर निशाणा साधला. “७५० मीटर लांबीच्या या उड्डाणपुलासाठी २४८ कोटी रुपये खर्च झाले. म्हणजे प्रति मीटर सुमारे ३३ लाख रुपये खर्च झाले. तरीही उद्घाटनाच्या दिवशीच पुलावर खड्डे दिसत आहेत,” अशी टीका त्यांनी केली. सात वर्षे विलंब, वाढलेला खर्च आणि ठेकेदारावर दंडात्मक कारवाई झाल्यानंतरही अशी अवस्था का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. वाद वाढताच मुंबई महानगरपालिकेने याबाबत स्पष्टीकरण दिले. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, पुलावरील जे सांधे किंवा पॅचवर्कसारखे भाग दिसत आहेत ते प्रत्यक्षात ‘मॅस्टिक ॲस्फाल्ट’ टाकण्याच्या तांत्रिक प्रक्रियेचा भाग आहेत. पुलाच्या संरचनेच्या सुरक्षिततेशी किंवा गुणवत्तेशी त्याचा कोणताही संबंध नसल्याचा दावा पालिकेने केला आहे.

### महापालिकेच्या निवेदनात काय म्हटले?

महापालिकेच्या निवेदनात म्हटले आहे की, नव्याने टाकलेल्या मॅस्टिक ॲस्फाल्टचा पृष्ठभाग सुरुवातीला तुलनेने गुळगुळीत असतो. वाहने घसरणार नाही असा पृष्ठभाग मिळावा यासाठी त्यावर दगडी पॅच लावले जातात. त्यामुळे सुरुवातीला रस्ता असमान किंवा पॅचवर्क केल्यासारखा दिसू शकतो. मात्र वाहतूक सुरू झाल्यानंतर हा पृष्ठभाग हळूहळू नीट होत जातो. मात्र महापालिकेच्या या स्पष्टीकरणावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### गुणवत्ता चाचणीचा अहवाल जाहीर करण्याची मागणी

अनिश गवांडे यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि मुंबईच्या महापौरांना पत्र लिहून पुलाच्या पृष्ठभागाच्या गुणवत्ता चाचणीचा अहवाल जाहीर करण्याची मागणी केली आहे. “२४८ कोटी रुपयांचा पूल अपूर्ण अवस्थेत सुरू करण्यात आला आणि आता नागरिकांच्या वाहनांनाच अंतिम काम पूर्ण करण्यासाठी वापरले जात आहे का?” असा सवाल त्यांनी केला. या उड्डाणपुलाच्या कामाला गेल्या काही वर्षांत अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला होता.

# डार्लिंग आता बस झालं...

## सतत 'पुरावा' मागत महिला पत्रकारानं ट्रम्प यांना चांगलंच केलं हैराण

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचा एक व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. यात डोनाल्ड ट्रम्प एका लाईव्ह मुलाखतीतून उठून जाताना दिसत आहे. ते मुलाखतकार महिला पत्रकारावर चांगलेच भडकेले दिसत आहेत. तर दुसरीकडे महिला पत्रकाराने देखील डोनाल्ड ट्रम्प यांना कात्रीत पकडत आपल्या प्रश्नावर ठाम असल्याचं दिसत आहे.**



डोनाल्ड ट्रम्प यांनी एनबीसी अँकर क्रिस्टिन वेल्कर यांना अप्रमाणिक, स्टुपीड म्हणत तो इंटरव्हू सोडला. अँकर क्रिस्टिन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅलिफोर्नियामध्ये संथ मतमोजणी सुरू असल्यावरून टीका केली होती. त्यावेळी त्यांनी या निवडणुकीत गोंधळ झाला असल्याचा दावा केला. यावर पत्रकार क्रिस्टिन यांनी पुरावे द्या तुम्ही पुरावे देत नाहीये असं म्हणत ट्रम्प यांना चांगलंच घेरलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅलिफोर्निया मतमोजणीवर आक्षेप नोंदवताच पत्रकार क्रिस्टिन यांनी कारण ते बॅलट पेपरची टॅली करत आहेत त्यामुळं उशीर होत आहे असं सांगितलं. त्यावेळी ट्रम्प यांनी तुम्हाला माहिती आहे का ते असं का करत आहेत? कारण ते निवडणुकीत घोटाळा करत आहेत.'

यानंतर पत्रकार क्रिस्टिन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे थेट पुरावा मागितला. त्यावर डोनाल्ड ट्रम्प चाचपडले आणि त्यांनी मी असं लोकांकडून ऐकलं आहे असं सांगितलं. त्यावर हा काही पुरावा नाही असं म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांना घेरलं. त्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी मतदानानंतर पाच दिवस मतमोजणी चालणे हे योग्या आहे का असा प्रश्न विचारला. ते अजूनही विजेता निवडू शकलेले नाहीत असं सांगितलं.

यावर पत्रकाराने प्रक्रिया संथ आहे मात्र कॅलिफोर्नियाचे अधिकारी यावर काम करत आहेत असं सांगितलं. त्यावर कॅलिफोर्नियाचे निवडणूक अधिकारी हे अप्रमाणिक असून तुम्ही पत्रकार आणि तुमचे पत्रकार मित्र देखील अप्रामाणिक असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला.

ट्रम्प म्हणाले, ते तुमच्याप्रमाणेच अप्रमाणिक आहेत तुमचा मीडिया हा अप्रमाणिक आहे. मीट द प्रेस हे देखील अप्रामाणिक आहे. निवडणुकीच्या बाबतीत अमेरिका हा अप्रगत देशांसारखा आहे असं देखील ट्रम्प यांनी सांगितलं.

त्यावर पत्रकार क्रिस्टिन यांनी, मी अप्रामाणिक नाही. त्यावर ट्रम्प यांनी तुम्ही एकतर अप्रामाणिक आहात किंवा मूर्ख आहात. तुम्ही तुम्ही त्यांच्या हातातील बाहुलं आहात. तुम्हीला माहिती आहे की ही निवडणूक एक घोटाळा आहे. तुमच्या नेटवर्कला माहिती आहे की हा घोटाळा आहे.

### डोनाल्ड ट्रम्प मुलाखतीतून गेले ऊठून

या दरम्यान, पत्रकार याचे सतत पुरावे मागत राहिली. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी पुरावे न देता मुलाखत अर्ध्यात सोडून जाणंच पसंत केलं. ते मुलाखत सोडून देताना म्हणाले, 'माफ करा, तुम्ही याला मी सोडून गेलो असं म्हणता मात्र आता बस झालं. आभारी आहे डार्लिंग. तुम्हाला दिवस चांगला जावो.' असं म्हणतं ट्रम्प यांनी माईक काढला आणि जमिनीवर फेकून दिला. मुलाखतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला असून, ट्रम्प यांच्या या वागणुकीवर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय; अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या केली कमी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाचे परिणाम अवघ्या जगावर होत आहेत. हे युद्ध सुरू होऊन तब्बल तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे, पण अद्यापही हे युद्ध थांबलेलं नाही. युद्धविराम असतानाही पुन्हा एकदा हे युद्ध भडकल्यामुळे जगात खळबळ उडाली आहे. या युद्धामुळे मध्यपूर्वेत युद्धाचे ढग अधिक गडद झाले आहेत.**




### अनुदानित सिलिंडरबाबत काय निर्णय घेतला?

वृत्तानुसार, एलपीजी गॅस सिलिंडरच्या वाढत्या किंमती आणि अनुदानावरील एलपीजी सिलिंडरवरील वाढीव खर्च लक्षात घेता केंद्र सरकारने आता अनुदानित एलपीजी सिलिंडरची संख्या ९ वरून ४ पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकार प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दरवर्षी जवळपास ९ गॅस सिलिंडर कमी किंमतीत मिळत होते.

अमेरिका -इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे याचा सर्वाधिक फटका अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला बसत आहे. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाची जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होत आहे. त्यामुळे केंद्र सरकार देखील अलर्ट झालं असून काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी इंधनाचा जपून वापर करण्याचं आवाहन केलं होतं.

पश्चिम आशियातील तणावामुळे मागील काही दिवसांपासून पेट्रोल-डिझलेच्या आणि एलपीजी सिलेंडरच्या किंमती देखील वाढत असल्याचं दिसून येत आहे. यातच आता केंद्र सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या कमी केली आहे, म्हणजे आता उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अनुदानित एलपीजी सिलिंडरची संख्या ९ वरून ४ पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना आता दरवर्षी अनुदानित ४ गॅस सिलिंडर मिळतील. उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना ६४२ रुपयांना हे सिलिंडर मिळत आहेत. आता उज्ज्वला योजनेअंतर्गत ६४२ मध्ये आता वर्षाला ४ सिलिंडरच मिळतील. ४ पेक्षा जास्त गॅस सिलिंडर लागल्यास त्यासाठी अधिकची रक्कम मोजावी लागणार आहे. दरम्यान, मे २०१६ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना सुरुवातीला दरवर्षी १२ अनुदानित १४.२-किलो वजनाचे एलपीजी सिलिंडर मिळत होते. त्यानंतर गेल्या वर्षी हा कोटा ९ सिलिंडरपर्यंत कमी करण्यात आला होता.

# एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये रश्मिका झळकणार?



भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज गायिका एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या जीवनावर आधारित बायोपिकची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक गौतम तिन्ननुरी करणार असून, मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्री रश्मिका मंदाना यांचे नाव आघाडीवर असल्याचे वृत्त समोर आले आहे. काही माध्यमांच्या अहवालानुसार, एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या भूमिकेसाठी रश्मिका मंदाना यांची निवड करण्यात आली आहे. यासाठी नुकतीच त्यांच्या घरी लूक टेस्टही घेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या चित्रपटात त्या महान गायिकेची भूमिका साकारण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या भूमिकेसाठी यापूर्वी इतर अभिनेत्रींचीही नावे चर्चेत होती. सुरुवातीला साई पल्लवी यांचे नाव पुढे आले होते. त्यांनी या भूमिकेची तयारी म्हणून कर्नाटक संगीताचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केल्याची माहितीही समोर आली होती. त्यानंतर रुक्मिणी वसंत यांची निवड झाल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. त्यामुळे मुख्य भूमिकेसाठी नेमकी कोणाची निवड झाली आहे, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. विशेष म्हणजे, चित्रपट निर्मात्यांकडून किंवा दिग्दर्शकांकडून अद्याप कोणत्याही अभिनेत्रीच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहत्यांना अंतिम घोषणेची प्रतीक्षा करावी लागणार आहे. या बायोपिकचे दिग्दर्शन गौतम तिन्ननुरी करणार आहेत. त्यांनी यापूर्वी 'जर्सी'सारखा गाजलेला चित्रपट दिग्दर्शित केला होता. एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या जीवनावरील हा चित्रपट वास्तवदर्शी आणि प्रभावी बनवण्यासाठी ते गेल्या काही काळापासून सखोल संशोधन करत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, रश्मिका मंदाना तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळेही चर्चेत आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ट्रेलरला मिळालेल्या प्रेमाबद्दल रश्मिकाने सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांचे आभार मानले आहेत. 'कॉकटेल २' हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. होमी अदजानिया दिग्दर्शित या चित्रपटात शाहिद कपूर, कृती सेनन आणि रश्मिका मंदाना प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. आता एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका कोण साकारणार, याकडे चित्रपटप्रेमींचे लक्ष लागले आहे.





## 'अल्फा' चित्रपटाची टीझर डेट समोर

अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ आगामी 'अल्फा' (Alpha) या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटात पहिल्यांदाच इंडस्ट्रीतील दोन मोठ्या अभिनेत्री जबरदस्त ॲक्शन करताना दिसणार आहेत. आता या चित्रपटाबाबत एक मोठे अपडेट समोर आले आहे. चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज झाला आहे.वरिष्ठ ट्रेड ॲनालिस्टनुसार,'अल्फा'चा टीझर १० जून म्हणजेच बुधवारी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी प्रोडक्शन हाऊसकडून जोरदार मार्केटिंग स्ट्रॅटेजी आखली गेली आहे. चित्रपटाचे निर्माते आदित्य चोप्रा यांनी 'अल्फा' प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपल्या टीमसह तगडी तयारी केली आहे. आदित्य चोप्रा आणि त्यांची टीम 'अल्फा'चे प्रमोशन अगदी वेगळ्या पद्धतीने करणार आहेत. 'अल्फा' हे केवळ एका पात्राचे किंवा चित्रपटाचे नाव नसून ती एक 'विचारसरणी' आहे, असा संदेश प्रेक्षकांमध्ये पोहोचवला जाईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना डोळ्यासमोर ठेवून विविध ॲक्टिव्हिटी केल्या जातील. मुख्य अभिनेत्री शर्वरी आणि आलिया यामध्ये आधुनिक विचारसरणीचे प्रतिनिधित्व करताना दिसतील. या चित्रपटात आलिया आणि शर्वरीला यापेक्षा पूर्णपणे वेगळ्या आणि शक्तिशाली रूपात दाखवले जाईल, जे प्रेक्षकांना आकर्षित करू शकते.

# अभिनेत्री जेनिफर विंगेट दुसऱ्यांदा अडकणार लग्नबंधनात





टीव्ही अभिनेत्री जेनिफर विंगेट तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. ४१ वर्षांची जेनिफर विंगेट दुसऱ्यांदा लग्न करणार असल्याच्या चर्चांना सध्या उधाण आले आहे. अभिनेता करण सिंग ग्रोव्हरसोबत घटस्फोट झाल्यानंतर तब्बल १२ वर्षांनी अभिनेत्री दुसऱ्यांदा संसार थाटणार असल्याचे बोलले जात आहे. ती लवकरच सिंगापूरचे बिझनेसमन इश्माएल विलियम यांच्यासोबत लग्नगाठ बांधू शकते, असे म्हटले जात आहे. हे दोघेही गेल्या बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत असून, आता ते आपल्या नात्याला अधिकृत नाव देण्याच्या तयारीत आहेत. एका रिपोर्टनुसार, जेनिफरच्या बॉयफ्रेंडने एका व्हेकेशन दरम्यान तिला लग्नासाठी प्रपोज केले होते. दीर्घकाळापासून एकमेकांना डेट करणारे हे जोडपे या वर्षाच्या शेवटी किंवा पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला लग्न करू शकतात. जेनिफर विंगेट आणि विलियम हे दोघेही ख्रिश्चन आहेत, त्यामुळे हे दोघेही ख्रिश्चन रितीरिवाजांनुसार लग्न करणार असून, या सोहळ्यात त्यांचे जवळचे मित्र हरलीन सेठी आणि रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. सध्या हे दोघे आपल्या लग्नासाठी योग्य ठिकाण शोधत आहेत. दोघांनी तयारी सुरू केली असून, ते या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर किंवा डिसेंबर-जानेवारी दरम्यान लग्न करू शकतात.

जेनिफर विंगेटने पहिले लग्न अभिनेता करण सिंग ग्रोव्हरसोबत केले होते. या दोघांची भेट 'दिल मिल गए' या टीव्ही मालिकेच्या सेटवर झाली होती. एकत्र काम करत असतानाच दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले आणि काही काळातच त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. २०१२ मध्ये हे कपल लग्नबंधनात अडकले होते. लग्नानंतर अवघ्या २ वर्षांतच जेनिफर विंगेट आणि करण सिंग ग्रोव्हर यांचे नाते तुटले. २०१४ मध्ये दोघांनी अधिकृतपणे घटस्फोट घेतला. त्यानंतर करण सिंग ग्रोव्हर त्याच्या आयुष्यात पुढे गेला आणि त्याने बॉलिवूड अभिनेत्री बिपाशा बासूसोबत तिसरे लग्न केले.

# टीम इंडियाचा ऐतिहासिक विजय!

## भारताच्या 564 धावांनंतर अफगाणिस्तानचे दोन्ही डाव स्वस्तात आटोपले

**महाईन्यूज । मुल्लानपूर**

**अफगाणिस्तानचा संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये कसोटी आणि वनडे मालिकेचा थरार रंगणार आहे. दोन्ही संघांमधील एकमेव कसोटी सामन्याचा थरार मुल्लानपूरमध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला. सामन्यातील पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी फलंदाजांनी मोलाचं योगदान दिलं. त्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी गोलंदाजांनी २० विकेट्स घेऊन भारताला हा सामना जिंकून दिला. या सामन्याचा निकाल तिसऱ्याच दिवशी लागला. भारताने हा सामना १ डाव आणि ३०० धावांनी जिंकून मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.**





### भारताचा कसोटीमधील सर्वात मोठा विजय

- भारत विरूद्ध अफगाणिस्तान- १ डाव आणि ३०० धावा, मुल्लानपूर, २०२६*
- भारत विरूद्ध वेस्ट इंडिज- १ डाव आणि २७२ धावा, राजकोट, २०१८
- भारत विरूद्ध अफगाणिस्तान- १ डाव आणि २६२ धावा, बंगळुरु, २०१८
- भारत विरूद्ध बांगलादेश- १ डाव आणि २३९ धावा, मीरपूर, २००७
- भारत विरूद्ध श्रीलंका- १ डाव आणि २३९ धावा, नागपूर, २०१७

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने ८ गडी बाद ५६४ धावा केल्या. सलामीला आलेला यशस्वी जैस्वाल अवघ्या २४ धावांवर माघारी परतला. त्यानंतर केएल राहुल आणि साई सुदर्शनने मिळून डाव सांभाळला. केएल राहुलने १०० धावा केल्या. तर साई सुदर्शनने ८१ धावा केल्या. तर कर्णधार शुबमन गिलने १२६ धावांची खेळी केली. ऋषभ पंतने ८१ धावांची खेळी केली. शेवटी ध्रुव जुरेलने १९ आणि वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ५२ धावांची खेळी केली.

या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानकडून रहमत शाहने सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाची साथ मिळाली नाही. या डावात भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना पहिलाच सामना खेळत असलेल्या मानव सुथारने सर्वाधिक ६ गडी बाद केले. अफगाणिस्तानचा पहिला डाव अवघ्या १५२ धावांवर आटोपला. त्यामुळे शुबमन गिलने अफगाणिस्तानला फॉलो ऑन देण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या डावातही अफगाणिस्तानचे फलंदाज फ्लॉप ठरले. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक ४ तर कुलदीप यादवने ३, मानव सुथारने १ आणि मोहम्मद सिराजने १ गडी बाद केला. अफगाणिस्तानचा दुसरा डाव अवघ्या ११२ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना १ डाव आणि ३०० धावांनी आपल्या नावावर केला.

## नियम फक्त खेळाडूंसाठीच का? पाकिस्तानी कर्णधारासोबत जय शाह यांचे हँडशेक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**येत्या काही दिवसात इंग्लंडमध्ये महिला टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेसाठी सर्व संघ इंग्लंडमध्ये दाखल झाले आहेत. ही स्पर्धा सुरु होण्याआधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसीचे) चेअरमन जय शाह यांचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. ज्यात जय शाह हे पाकिस्तान महिला क्रिकेट संघाची कर्णधार फातिमा सना हिच्याशी हस्तांदोलन (हँडशेक) करताना दिसून येत आहे. हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताच नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.**




### महिला टी-20 विश्वचषकासाठी रंगली तयारी

यंदाच्या महिला टी-20 विश्वचषकाचे आयोजन इंग्लंड येथे होत असून सर्व संघांनी अंतिम तयारीला वेग दिला आहे. स्पर्धेला 12 जूनपासून सुरुवात होणार आहे. भारतीय संघ आपला मोहिमेचा शुभारंभ 14 जून रोजी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. त्यानंतर भारताचे सामने आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका यांच्याविरुद्ध होणार आहेत. कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ यंदा विश्वविजेतेपद जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार असून भारत-पाकिस्तान लढतीकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे.

आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेला येत्या १२ जूनपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेआधी आयसीसीचा कॅप्टन्स फोटोशूटचा अधिकृत कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमादरम्यान आयसीसीचे चेअरमन जय शाह यांनी देखील हजेरी लावली होती. या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या र्व संघांचे कर्णधार उपस्थित होते. ट्रॉफीसोबत सर्व कर्णधारांनी फोटोशूट केलं. तसेच जय शाह आणि आयसीसीच्या अधिकाऱ्यांनी सर्व कर्णधारांची भेट घेतली. यादरम्यान जय शाह हे पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिच्याशी हस्तांदोलन (हँडशेक) करताना दिसून आले. यावरुन चांगलाच वाद पेटला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानी खेळाडूंसोबत हँडशेक न करण्याचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानसोबत खेळणार, पण हँडशेक करणार नाही अशी भूमिका घेतली होती. त्यानंतर पुढील सर्व सामन्यांमध्ये असंच काहीसं चित्र पाहायला मिळालं होतं. सामना सुरु होण्याआधी किंवा सामना संपल्यानंतरही भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हँडशेक करणं टाळलं होतं. पण आता जय शाह यांनी हँडशेक केल्यानंतर वादाला तोंड फुटलं आहे. खेळाडूंसाठी वेगळे नियम आणि अधिकाऱ्यांसाठी वेगळे नियम? असा प्रश्न आता उपस्थित केला जाऊ लागला आहे.

जय शाह हे आयसीसीचे चेअरमन आहेत. त्यामुळे स्टेजवर असलेल्या प्रत्येक कर्णधारासोबत हँडशेक करणं हे नियमात होतं. या प्रकरणामागे कुठलाही राजकीय किंवा वादग्रस्त संदर्भ नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. उपस्थित कर्णधारांचं स्वागत करणं ही त्यांची जबाबदारी होती. त्यांनी त्यांचं कर्तव्य पार पाडलं, असं म्हटलं जात आहे. हा केवळ अधिकृत प्रोटोकॉलचा एक भाग होता. पण भारत- पाकिस्तानातील अतंर्गत तणावाच्या पार्श्वभूमीवर हा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
दि. 09 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# कचरा उघड्यावर; दंड थेट ३५ हजार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकून पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्यांवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने कठोर कारवाई केली आहे. 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाने चिखलीतील सेक्टर १३ परिसरात उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकल्याचे आढळून आल्यानंतर संबंधितांवर ३५ हजार रुपयांचा दंड ठोठावला.

'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २ मधील सेक्टर १३ येथे जैववैद्यकीय कचऱ्याची नियमबाह्य विल्हेवाट लावण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकारामुळे पर्यावरण प्रदूषणासह नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिकेने तातडीने दंडात्मक कारवाई केली.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, जैववैद्यकीय कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट ही पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांनी सांगितले की, स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सातत्याने कारवाई सुरू राहील.

सहाय्यक आरोग्य अधिकारी योगेश फल्ले आणि मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक राहुल राखपसरे, आरोग्य सहाय्यक अमोल घुसर तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या पथकाने ही कारवाई केली. महापालिका प्रशासनाने नागरिकांना जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे आवाहन केले असून पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.


### जैववैद्यकीय कचरा का धोकादायक?

रुग्णालये, दवाखाने, प्रयोगशाळा आणि आरोग्य केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्यात संसर्गजन्य घटक, वापरलेल्या सुया, रक्तमिश्रित साहित्य व इतर धोकादायक वस्तूंचा समावेश असतो. या कचऱ्याची उघड्यावर विल्हेवाट लावल्यास संसर्गजन्य आजारांचा प्रसार, पर्यावरण प्रदूषण आणि नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या कचऱ्याची शास्त्रोक्त आणि नियमबद्ध पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात करिअरची नवी संधी!

## आयआयबीएम कॉलेजमध्ये ट्रॅव्हल अँड टुरिझम डिग्री अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**एअरलाईन व पर्यटन उद्योगामध्ये वाढत असलेल्या रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन चिखली येथील आयआयबीएम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी स्टडीज येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या ट्रॅव्हल अँड टुरिझम डिग्री अभ्यासक्रमाचे सोमवारी (दि. ८ जून) दिमाखदार उद्घाटन करण्यात आले.**




बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेला हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असून, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामांकित एअरलाईन्स, ट्रॅव्हल व टुरिझम क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळणार आहे. कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना आधुनिक आणि रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच डॉ. वर्णेकर यांनी शिक्षकांना एअरलाईन उद्योगातील वाढ, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य, विभागप्रमुख आणि शिक्षकांनीही या अभ्यासक्रमाद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा संकल्प व्यक्त केला. या नवीन अभ्यासक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना करिअरची नवी दिशा मिळणार असून, एअरलाईन आणि पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमास प्राचार्य प्रदीप फुलकर, विभागप्रमुख अमोल भागवत, अनिकेत वंजारी, संदीप जाधव, प्रा. राहुल सर, मिलिंद उशिर, संतोष घाडगे, सिद्धार्थ गायकवाड, अनिकेत बिचुकले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विशेष उपयुक्त...

या अभ्यासक्रमाची शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदारी विभागप्रमुख कु. प्रतिक्षा डफळ आणि त्यांच्या तज्ज्ञ शिक्षकांच्या टीमकडे सोपविण्यात आली आहे. यावेळी बोलताना कु. प्रतिक्षा डफळ म्हणाल्या, “या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही विमान वाहतूक आणि पर्यटन क्षेत्रात आपली ओळख निर्माण करतील. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व व्यावसायिक कौशल्ये देण्यासाठी आमची संपूर्ण टीम कटिबद्ध आहे. आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि प्रभावी संवादकौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरणार आहे.”

## ‘टेक महिंद्रा ‘सेंटर ऑफ एक्सलन्स-सायबर सिक्युरिटी’चे उद्घाटन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ (डीवायपीआययू), आकुर्डी येथे उद्योग–शैक्षणिक सहकार्याला नवे बळ देणाऱ्या ‘टेक महिंद्रा – सेंटर ऑफ एक्सलन्स : सायबर सिक्युरिटी’ या अत्याधुनिक केंद्राचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि भविष्योन्मुख कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.**



या उद्घाटन सोहळ्यास टेक महिंद्राचे वरिष्ठ अधिकारी पियूष मारवाह (उपाध्यक्ष व समूह वितरण प्रमुख), जसनीत कौर खन्ना (समूह व्यवस्थापक – पीपल सप्लाय चेन), नताशा वर्मा (वरिष्ठ सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ) आणि मेघना आशीष जगताप (ग्लोबल प्रोसेस ऑफिस ऑपरेशन्स लीड) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनीष भल्ला यांच्या हस्ते मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर नव्याने उभारण्यात आलेल्या सायबर सिक्युरिटी प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामुळे नवोपक्रम, कौशल्यविकास आणि अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता (प्लेसमेंट व कॉर्पोरेट रिलेशन्स) डॉ. अरुण सचेर यांनी उद्योगाभिमुख शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना, हे केंद्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगक्षेत्राच्या अपेक्षांमधील दरी कमी करण्यास मदत करेल, असे सांगितले. कुलगुरू डॉ. मनीष भल्ला यांनी या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता, तांत्रिक कौशल्ये आणि उद्योगक्षेत्रातील तयारी अधिक सक्षम होईल. विशेषतः सायबर सिक्युरिटी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात विद्यार्थ्यांना मोठ्या संधी उपलब्ध होतील.

सायबर सिक्युरिटी, मानव संसाधन व्यवस्थापन, प्रतिभा विकास आणि जागतिक प्रक्रिया व्यवस्थापन या क्षेत्रांतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील मौल्यवान अनुभव आणि मार्गदर्शन दिले. यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये नव्या संधींबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचा समारोप जस्मिता कौर यांनी आभार प्रदर्शनाने केला. त्यानंतर समूह छायाचित्र आणि स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

### नवीन ‘टेक महिंद्रा – सेंटर ऑफ एक्सलन्स...

सायबर सिक्युरिटी’ हे केंद्र विद्यार्थ्यांसाठी प्रगत शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहभागाचे प्रभावी व्यासपीठ ठरणार असून, डिजिटल युगातील सक्षम आणि भविष्यासाठी सज्ज व्यावसायिक घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे पियूष मारवाह यांनी संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास बाळगण्याचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करण्याचा सल्ला देताना त्यांनी सायबर सिक्युरिटीचे तीन मूलभूत स्तंभ – गोपनीयता (कॉन्फिडेन्शिअॅलिटी), अखंडता (इंटिग्रिटी) आणि उपलब्धता (अव्हेलेबिलिटी) – यांचे महत्त्व स्पष्ट केले. याशिवाय त्यांनी एजेंटिक एआय आणि जनरेटिव्ह एआय यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्राविण्य मिळवण्याचे आवाहन केले. सतत शिकण्याची वृत्ती, व्यावसायिक प्रमाणपत्रे मिळवणे आणि प्रभावी संवादकौशल्ये विकसित करणे हे यशस्वी कारकिर्दीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# डी. वाय. पाटीलला ‘प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस पार्टनर’ सन्मान

## शिक्षण विश्व : हैदराबाद येथील ग्लोबल पीस ऑडिटोरियम येथे कार्यक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी यांना पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस पार्टनर’ हा मानाचा बहुमान प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान रिसर्च हाइट्स फाउंडेशन व एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (EPTRI) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘भारत एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम – भारत सस्टेनेबिलिटी कॅम्पस मिशन २०२६’ अंतर्गत प्रदान करण्यात आला.**



जागतिक पृथ्वी सप्ताह (२२ ते २९ एप्रिल २०२६) निमित्त हैदराबाद येथील ग्लोबल पीस ऑडिटोरियम येथे आयोजित विशेष कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने डॉ. अशोक मोरे, डॉ. स्वाती जाधव आणि डॉ. सुहास पाटील यांनी सहभाग नोंदवून संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र स्वीकारले. महाविद्यालयाने कॅम्पस परिसरात राबविलेल्या हरित उपक्रम, पर्यावरण जनजागृती, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत, जलसंधारण, प्लास्टिकमुक्त परिसर, विद्यार्थी सहभाग आणि शाश्वत विकासासाठी केलेल्या विविध प्रयत्नांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

या यशाबद्दल डॉ डी वाय पाटिल शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष श्री. सतेज पाटील, डी वाय पाटिल प्रतिष्ठान चे विश्वस्त श्री. तेजस पाटील, संकुलाचे संचालक रीअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी मालती, यांनी सर्व सहभागीचे अभिनंदन केले. हा सन्मान संस्थेच्या शाश्वत भारत घडविण्याच्या बांधिलकीची पावती असून भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सचा शिक्षक अभिमुखता कार्यक्रम उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सच्या वतीने नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला शिक्षक अभिमुखता (Teachers’ Orientation) कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. त्यानंतर पारंपरिक घाटोळी गीत सादर करण्यात आले. दीपप्रज्वलन, पूजन व मान्यवरांच्या सत्काराने कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात झाली.

गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सचे आदरणीय अध्यक्ष मा. श्री. विनायक भोंगाळे सर यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षकांना सकारात्मक विचार, समर्पण आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन ठेवून कार्य करण्याचा संदेश दिला. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित शिक्षकांमध्ये नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

कार्यक्रमात नगरसेविका सौ. कविताताई भोंगाळे पाटील यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत वाचन, आत्मविकास आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तसेच “Read to Lead” या उपक्रमाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाचन ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली असून नियमित वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती, भाषा कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढतो, असे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी स्वतः आदर्श निर्माण करावा तसेच विविध वाचन उपक्रम राबवावेत, असे आवाहन करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्रीमती अंजली भागवत मॅडम तसेच विपणन प्रमुख मा. श्री. शैलेंद्र सिंग यांनी शिक्षकांना संस्थेचे नियम, कार्यपद्धती, शिस्त, जबाबदाऱ्या आणि आगामी शैक्षणिक वर्षातील अपेक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व शिक्षकांना आनंदी मनाने, जबाबदारीची जाणीव ठेवून आणि संघभावना जोपासत कार्य करण्यासाठी प्रेरित केले.

यावेळी विविध विभागप्रमुखांनी शैक्षणिक नियोजन, प्रशासन, विद्यार्थी सुरक्षा, अध्यापनातील गुणवत्ता, शालेय उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासंदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षकांनी नवीन शैक्षणिक वर्ष यशस्वी, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी समर्पित करण्याचा संकल्प व्यक्त केला. या अभिमुखता कार्यक्रमामुळे शिक्षकांमध्ये उत्साह, सकारात्मकता आणि नवचैतन्य निर्माण झाले.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे ‘पोश’ (POSH) विषयावरील जनजागृती प्रशिक्षण संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण कायदा (POSH ACT, 2013) या विषयावरील विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन विधिज्ञ व POSH तज्ज्ञ ॲड. गीतांजली कडाते यांनी केले.**

कार्यस्थळी सुरक्षित, सन्मानजनक व सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या प्रशिक्षणामध्ये POSH कायद्याच्या प्रमुख तरतुदी, लैंगिक छळाची व्याख्या, तक्रार निवारण प्रक्रिया, अंतर्गत तक्रार समितीची (Internal Committee) भूमिका तसेच कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

ॲड. कडाते यांनी विविध उदाहरणे, केस स्टडी आणि संवादात्मक चर्चेच्या माध्यमातून विषय सोप्या व प्रभावी पद्धतीने समजावून सांगितला. सहभागी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रशिक्षणातून महत्त्वपूर्ण ज्ञान प्राप्त केले.

विद्यालय व्यवस्थापनाने ॲड. गीतांजली कडाते यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या प्रशिक्षणामुळे कार्यस्थळी परस्पर आदर, संवेदनशीलता व सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होण्यास मदत झाली.

प्रियदर्शनी स्कूल, मोशी हे संस्थेच्या सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, समावेशक व प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित करीत असते.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
BLOOD
DONATION
DRIVE
Saturday, 13 June 2026
TIME: 09:30 AM - 12:30 PM
LOCATION: SCHOOL CAMPUS